INDIAN STREAMS RESEARCH JOURNAL
ISSN NO : 2230-7850
IMPACT FACTOR : 5.1651 (UIF)
VOLUME - 14 | ISSUE - 10 | NOVEMBER – 2024

# बोली : संकल्पना , स्वरूप व उपयोजन

डॉ. आनंदा गांगुर्डे
मराठी विभाग प्रमुख, विद्या प्रतिष्ठान महाविद्यालय , बारामती .



भाषा हे साहित्याचे मूलद्रव्य आहे. कोणत्याही कलाकृतीचा आशय भाषेद्वाराच अभिव्यक्त होत असतो. साहित्याशी संबंधित असे सर्व घटक समाजाशी निगडित असतात. निर्माता लेखक, त्याने निर्मिलेली साहित्यकृती आणि साहित्यकृतीचा वाचक असे तीनही घटक समाजाशी निगडित असतात . साहित्याचे माध्यम असणारी भाषा समाजाची निर्मिती असते .मनुष्य हा समाजशील प्राणी आहे .तो समाजात राहत असतो. मानवी समाज केवळ भाषेमुळेच अस्तित्वात येत असतो .भाषा हे मानवी समाजाचे संज्ञापन साधन आहे .समाजातील इतर घटकांबरोबर संपर्क साधण्यासाठी माणूस भाषा या साधनाचा उपयोग करीत असतो .म्हणून मानवी जीवनात भाषेचे स्थान अनन्यसाधारण आहे. रोजच्या दैनंदिन व्यवहारात भाषेचे स्वरूप तात्कालीक असते . विशिष्ट संदेश श्रोत्यांपर्यंत पोहोचवला की भाषेचे कार्य संपते .आणि कालांतराने आपण ती विसरूनही जातो. पण भाषा व्यवहाराचा दुसराही एक प्रकार आहे तो असा तात्कालीक नसतो .तर तो शाश्वत चिरंजीव असतो.या प्रकारच्या भाषा व्यवहाराला वाङ्मय असे म्हणतात .वांग्मय दोन प्रकारचे असते मौखिक आणि लिखित .अनेक आदिवासी समाजांच्या भाषा केवळ बोली स्वरूपात असतात .त्या लिखित स्वरूपात नसतात. पण त्यांच्यामध्ये वांङमय निर्मिती चालू असते .जे वांङमय मौखिक स्वरूपाचेअसते .ज्या भाषांना लेखन पद्धती असते . त्यांच्यामध्ये निर्माण होणारे सर्वच वाङ्मय लिखित असतेच असे नाही. त्यांच्यामध्येही मौखिक वाङ्मयाची निर्मिती चालू असते. मराठीतही लिखित वाङ्मयांबरोबरच लोकगीते , लोककथा , म्हणी व उखाणे इत्यादी प्रकारचे विपुल मौखिक वांङमय निर्माण झाले आहेत. त्यातील गद्याच्या भाषेत छोटी छोटी लयबद्ध वाक्ये, विशिष्ट टप्प्याला फिरून फिरून येणारे तेच तेच शब्दबंद ,छोटे छोटे रचना बंद इत्यादी वैशिष्ट्य आढळून येतात .पद्याच्या भाषेतही कडवी ,धृपद, स्फूट रचना , गेयता इत्यादी वैशिष्ट्ये आढळून येतात. लिखित वाङ्मयाला मात्र अशा प्रकारची बंधने असत नाही. त्यामध्ये विविध प्रकारचे रचनाबंद, लहान-मोठे आकार ,भाषेचे विविध प्रकार ,एक प्रकारचा सफाईदारपणा इत्यादी वैशिष्ट्य आढळून येतात . डॉ.कल्याण काळे वांङमयाचे वर्गीकरण करताना लिहितात की , " वाङमयाचे वैचारिक आणि ललित वाङमय असे दोन वर्ग पडतात .वैचारिक वाङ्मयाचा मुख्य उद्देश समाजाला ज्ञान देणे हा असतो आणि ललित वाङ्मयाचा उद्देश आनंद देणे हा असतो .ललित वांग्मयाला साहित्य असेही म्हणतात .शास्त्रीय वाङ्मय हा वैचारिक वाङ्मयाचा एक प्रकार आहे .ज्ञानाचा शोध त्याचे संरक्षण आणि संवर्धन इत्यादी त्यांचे कार्य असते .भाषेच्या विविध प्रकारच्या

आविष्कारामध्ये व्यवहार भाषा, साहित्य भाषा आणि शास्त्र भाषा हे प्रातिनिधिक स्वरूपाचे परस्पर भिन्न आणि वैशिष्ट्यपूर्ण आविष्कार आहेत ." १ परंतु असे असले तरी भाषा म्हणून तिच्या शब्द ,वाक्य अशा घटकांसह सर्वत्र सारखीच राहिली पण भिन्नसंदर्भानुसार तिला भिन्न भिन्न कळा लाभत गेली .फक्त तिचे संदर्भ बदलतात संदेशवहनाचे कार्य मात्र तेच राहते .फक्त संदेशवहनाचे स्वरूप बदलते .परिणामी या प्रत्येक ठिकाणी ती वेगळ्या त-हेची दिसू लागते. बोलणारा ,ऐकणारा व संदेश हे तीन घटकच सर्वत्र प्रभावी असतात. त्यांच्या स्वरूपात बदल झाला की भाषेची कळाही बदलते. विचार विनिमयाचे माध्यम म्हणजे भाषा .आपले विचार व्यक्त करण्याचे एक महत्त्वाचे साधन म्हणजे भाषा होय . साहित्यिक भाषेच्या आधारेच आपला अनुभव आविष्कृत करतो. कादंबरीमध्ये मानवी जीवनाचे दर्शन घडत असते. पण ते घडवण्यासाठी भाषा हे महत्त्वाचे माध्यम आहे. साहित्यातील आशय परिणामकारक होण्यासाठी साहित्यिक वेगवेगळ्या प्रकारची भाषा वापरतो व ती वेगवेगळ्या पद्धतीने वापरतो .साहित्याची भाषा व्यवहारभाषेपेक्षा पूर्णतः वेगळी असते .ती अचूक व काटेकोर असते .व्याकरण व शुद्धलेखनाच्या चौकटीत बसवलेली असते. साहित्यात भावानुभवाला अधिक महत्त्व असते. त्यामुळे साहित्याची भाषा अनेकार्थी असते .याविषयी भालचंद्र खांडेकर लिहितात, " साहित्याची भाषा पुष्कळ वेळा आत्मपर , आत्मनिष्ठ, संवेदनशील असते. कलावंताचे भाव त्याचे स्वतःचे असतात .असे भाव व्यक्त करायला त्याच साहित्यिकाची भाषा लागते. साहित्यिक मन हे कलावंताचे मन असते . ते एका व्यक्तीचे मन असते. त्याला व्यक्तिमन असे म्हणतात. साहजिकच हे व्यक्तिमन प्रकट करण्यासाठी भाषेचा उपयोग केला जातो." २ सफाईदार भाषेद्वाराच व्यक्तिमत्त्व प्रकट होते. नाटककार आपले विचार व्यक्त करण्यासाठी संवाद रुपी भाषेचे सहाय्य घेतो. तसेच कवी आणि कादंबरीकार सुद्धा आपल्या भावभावनांचे चित्रण करण्यासाठी संवादरूपी भाषेचा उपयोग करतो .आशयानुरुप शब्दांची निवड करून त्यांची मांडणी आपल्या निवडीनुसार करीत असतात .नाटककार जीवनातील सत्य पटवून देण्याचा प्रयत्न करतो तर कवी भावनात्मक व कलात्मक सौंदर्याचा आविष्कार करीत असतो. आपल्या उद्दिष्टाला योग्य अशा शब्दांची निवड व मांडणी दोघेही करतात आणि दोघांच्या दोन प्रकारच्या या मांडणी म्हणजेच दोन शैली. दोन्हींची भाषा काव्यात्म असते. तरीही काव्यातील भाषेपेक्षा नाटकातील भाषा वेगळी असते .प्रत्येक साहित्य कलात्मक पातळीवर पोहोचते .जीवन विषयक सगळ्या क्षेत्रात तिचा वापर होतो. भाषेच्या बाबतीत हे समृद्धतेचे व संपन्नतेचे लक्षण मानावे लागते . " कोणत्याही भाषेच्या बाबतीत समृध्दतेचे व संपन्नतेचे लक्षण म्हणजे जीवनाच्या विविध क्षेत्रात ती वापरली जाणे हे होय . " ३ असे मत डॉ.कल्याण काळे यांनी व्यक्त केले आहे .

बोली हे भाषेचे जिवंत रूप आहे .एक भाषक समाजाच्या एका गटाकडून किंवा एक भाषक समाजाच्या एखाद्या विशिष्ट प्रदेशातील लोकांकडून देवाणघेवाणीसाठी दैनंदिन वापराचे प्रत्यक्ष व्यवहारातले भाषिक साधन असल्याने बोली आपोआपच जिवंत व स्वाभाविक स्वरूप धारण करीत असते .बोलीला स्थानिक मातीचा गंध असतो. विशिष्ट प्रांतातील स्थानिक पातळीवर ती बोलली जाते. तेथील दैनंदिन व्यवहारात प्रामुख्याने तिचा वापर केला जातो .या संदर्भात डॉ.ना.गो .कालेलकर लिहितात . " बोली हे दैनंदिन व्यवहाराचे स्वाभाविक साधन आहे . परिस्थितीला अनुरूप अशा भाषिक सामग्रीचा ती उपयोग करते . मुखपरंपरेने आल्यामुळे तिच्या अंगी एक प्रकारचा जिवंतपणा असतो .ती साधी पण परिणामकारक असते. तिची स्वाभाविकता हेच तिचे वैशिष्ट्य ." ४

बोलीला स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व नाही .ती कोणत्यातरी प्रमाणभाषेच्या संदर्भात वापरली जाते. उदाहरणार्थ कोकणी ही मराठीची बोली आहे. कोकणीला अस्तित्व आहे ते मराठी भाषेच्या संदर्भात. याचे कारण असे की कोकणी बोली बोलणारे लोक इतर मराठी लोकांशी बोलताना प्रमाण मराठी भाषेचा वापर करतात. तसेच ते शासकीय व्यवहार, शिक्षण ,लेखन व्यापार

यासाठी प्रमाण मराठीचाच वापर करतात. मात्र सर्व कोकणी माणसे आपापसात दैनंदिन व्यवहार करताना न चुकता प्रमाण मराठीच्या ऐवजी आपल्या कोकणी बोलीचा आवर्जून वापर करतात. प्रमाणभाषा आणि बोलीभाषा या दोन्ही संदेशवहनाचे कार्य करीत असल्या तरी त्यांचे स्वरूप भिन्न असते .परिणाम क्षमता भिन्न असते .कोकणी ,खानदेशी, वऱ्हाडी ,अहिराणी ,वैदर्भी मालवणी अशा विविध प्रांतात बोलल्या जाणाऱ्या मराठीच्या बोलीभाषा आहेत .समाजातील गटांची वेगळी बोली कधी व कशी निर्माण होते याविषयी डॉ .ना.गो .कालेलकर लिहितात की , " समाजाच्या सर्वच व्यक्ती सदोदित एकत्र येऊन आपले व्यवहार करत नाहीत .काही व्यवहार एखाद्या विशिष्ट वर्गापुरते मर्यादित असतात .कारण समाजरचनेचा तो एक आवश्यक भाग असतो. अशा वर्गातल्या लोकांच्या भाषेचे स्वरूप आणि तिची पातळी सामान्य भाषेपेक्षा वेगळी होते .अशा रीतीने भिन्न असणारी ही भाषा एकाच व्यवसायातल्या अनेक व्यक्तींना एकत्र आणणारी पण सामान्य भाषेतून दूर असलेली एक बोली होते ." तात्पर्य; समाजरचनेच्या किंवा सामाजिक व्यवहारांच्या गरजेतून एक भाषिक समाजाच्या आतच विविध गट तयार होणे हे बोलीच्या निर्मितीचे एक महत्त्वाचे कारण आहे ,असे दिसते. ललित साहित्याच्या दृष्टीने आवश्यक अशी गुणवैशिष्ट्ये फक्त बोलीभाषेतच दिसून येतात. १९४५ नंतरच्या वांङमयीन प्रवाहात म्हणजे ग्रामीण साहित्य , दलित साहित्य, आदिवासी साहित्य आदी साहित्य प्रवाहात बोलींचा वापर मोठ्या प्रमाणात झालेला दिसतो .उद्धव शेळके, रणजीत देसाई, व्यंकटेश माडगूळकर, जयवंत दळवी , आ.ना. पेडणेकर ,रा. रं. बोराडे, आनंद यादव ,अण्णा भाऊ साठे, बाबुराव बागुल , शंकरराव खरात , शंकर पाटील आदी लेखकांनी आपल्या साहित्यातून बोली भाषेचा आवर्जून वापर केला आहे ,केवळ बोलीसाठी बोली अशी आग्रही भूमिका न घेता त्या त्या साहित्यकृतीची एक स्वाभाविक गरज म्हणून बोलींचा वापर झाल्यास त्या साहित्यकृतींची कलात्मक उंची वृद्धिंगत होण्यास मदत होते .

महानगरीय उपेक्षित जीवनाचे चित्रण करणाऱ्या कादंबरीची बोली तपासल्यास कादंबरी कारांनी उपेक्षित समाजाची बोली वापरून कादंबरीतील व्यक्तिचित्रांना जिवंत केल्याचे दिसते. झोपडपट्टीतील स्थानिक बोली , दलित बोली व बकाल बोलींचा अंतर्भाव 'चक्र ' , ' वासूनाका ' , ' माहीमची खाडी ' , ' तो आणि त्याचा मुलगा ' , ' वस्ती वाढते आहे ' , ' झोपडपट्टी ' , ' हातभट्टी ' ' झिपऱ्या ' , ' कोंडी ' आदी झोपडपट्टीतील उपेक्षित जीवन चित्रण करणाऱ्या कादंबरीत झालेला दिसतो.

## संदर्भ ;

१. डॉ.कल्याण काळे , ' साहित्याची भाषा ', ' साहित्य विचार ' , सं. दत्तात्रय पुंडे , स्नेहल तावरे , स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे , द्वितीय आवृत्ती १९९६ ,पृष्ठ-६३

२. भालचंद्र खांडेकर , ' साहित्यविचार ' अनमोल प्रकाशन , पुणे . प्रथम आवृत्ती- १९८८, पृष्ठ - ९४

३. डॉ . कल्याण काळे , ' मराठी भाषा आणि साहित्य ' सं . वि.भा .देशपांडे ,मेहता पब्लिशिंग हाऊस , पुणे. प्रथम आवृत्ती १९९०, पृष्ठ-७

४.डॉ. ना.गो .कालेलकर, ' , भाषा ; ' इतिहास आणि भूगोल ' , मौज प्रकाशन , मुंबई .प्रथमावृत्ती १९६४ पृष्ठ - ९१

.डॉ.ना.गो .कालेलकर , ' भाषा आणि संस्कृती ' मौज प्रकाशन ,मुंबई. दुसरी आवृत्ती १९८२, पृष्ठ-४२